| MHSN060000491989 | **नियमित दिवाणी दावा : ७९/१९८९**<br>शामराव पोवार (मयत) तर्फे वारस वि.<br>श्रीमती. हौसाबाई चव्हाण (मयत) तर्फे वारस |
|---|---|

## निशाणी क्र. १५७ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १.६ यांनी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद होऊन त्यांची कैफीयत दाखल करुन घेणेकामी दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. त्या वयोवृध्द असून व्याधीग्रस्त असल्यामुळे त्यांना नेमले तारखेस मे. न्यायालयामध्ये हजर राहणे शक्य झाले नाही. तरी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद होऊन त्यांची कैफीयत दाखल करुन घेणेकामी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** वादी यांनी नि.१५८ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनानुसार, सदरचा अर्ज हा त्यांनी कोणत्याही अधिकारविना दिलेला असून तो चालणेस पात्र नाही. प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा असून त्यामध्ये त्यांनी उशीर झालेबाबत कोणतेही समर्पक कारणे व पुरावा दिलेला नाही. प्रतिवादी हया प्रतिवादी क्र.१ हौसाबाई तसेच त्यांचे पती बजरंग पांडुरंग चव्हाण यांचे वारस नाहीत. त्यामुळे त्यांना याकामी हजर होणेचा कोणताही अधिकार नाही. तसेच मे. जिल्हा न्यायालयामध्ये रिस्टोरेशनकरिता वादीने दाखल केलेल्या कामामध्ये प्रतिवादी यांनी बजरंग चव्हाण यांचेशी व त्यांच्या मिळकतीशी त्यांचा काही संबंध नसल्याचे करुन प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अशा परिस्थितीत प्रथम त्यांना त्यांच्या जन्माच्या नोंदीचा दाखल मे. न्यायालयामध्ये हजर करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रतिवादीचा या दाव्यातील मिळकतींशी काडीमात्र संबंध नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करुन प्रतिवादी यांचेवर र.रु.१०,०००/– दंड बसविणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

**४.** अर्ज वाचला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा पूर्वी दाखल केलेला रे.दि.मु.नं.२१३/१९६५ हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुचा दावा हा

प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ हया मयत झाल्या. त्यानंतर वादी यांनी तिचे वारसांना दावेकामी सामील करुन घेतले. त्यानंतर वारसांना दावेचे समन्स देखील काढण्यात आले. दावेचे समन्स प्रतिवादी क्र.१.६ यांना लागून सुध्दा त्या दावेकामी हजर न झाल्यामुळे त्यांचे विरुध्द दि.२२/०४/२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत करणेत आला. त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१.६ यांनी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद होऊन त्यांची कैफीयत दाखल करुन घेणेकामी परवानगी मागितली आहे. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन सक्त विरोध केला आहे. त्यांचे कथनानुसार, प्रतिवादी क्र.१.६ हे हौसाबाई यांचे वारस नाहीत. त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करता येणार नाही. दावेची पाहणी केली. त्यामध्ये वादी यांनीच हौसाबाई यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.१.६ यांना वारस म्हणून सामील केले असल्यामुळे त्यांना दावेचे समन्स/नोटीस सुध्दा काढणेत आलेले आहे. त्यामुळे वादी यांनी केलेले कथन याठिकाणी विचारात घेता येणार नाही.

**५.** प्रतिवादी क्र.१.६ चे कथनानुसार त्या जेष्ठ नागरिक असल्यामुळे तसेच वयोवृध्द व व्याधीग्रस्त असल्यामुळे त्यांना दावेकामी हजर राहणे शक्य झाले नाही. परंतु, प्रतिवादी क्र.१.६ यांनी त्याकामी कोणताही वैदयकीय दस्त प्रकरणात हजर केलेला नाही. तसेच प्रस्तुतचा अर्ज हा दि.२२/०४/२०२२ रोजीचा आदेश झालेनंतर दि.१२/१०/२०२३ रोजी म्हणजेच एक वर्षापेक्षा जास्त विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच दावा हा ४० वर्षांपेक्षा जास्त जुना आहे. एकंदरीत अर्जातील कथने पाहता प्रतिवादी यांनी दिलेली कारणे ही संयुक्तिक वाटत नाहीत. परंतु, न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी यांना बचावाची संधी मिळणे देखील आवश्यक आहे. वरील सर्व परिस्थिती लक्षात घेऊन प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करुन त्यांना त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. परंतु, त्याकरिता झालेल्या विलंबाबाबत र.रु. १,०००/– दंड करणे न्यायाचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १.६ यांचे विरुध्द दि.२२/०४/२०२२ रोजी झालेला एकतर्फा आदेश रदद करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र.१.६ यांनी झालेल्या विलंबाबाबत र.रु.१,०००/- वादींना दंड (कॉस्ट) म्हणून दयावी. सदरहू खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी वादीस न दिल्यास ती दावा खर्चात सामील करुन घेणेत यावी.

४. प्रतिवादी यांची कैफीयत आज रोजी वाचून दाखल करणेत येते.

Sd/---

मिरज **(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : ०२/०२/२०२४ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

*****

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 02.02.2024. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 02.02.2024. |
| Order uploaded on. | : | 02.02.2024. |